# मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७१/२०१८ मधील नि.६ खालील आदेश

CNR No. MHST01-002207-2018

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

०२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२१/०२/२००७ रोजी सकाळी १०.३० वाजताचे सुमारास अर्जदार यांचे पती गेणू श्रीपती जुनघरे, रा. दिवदेव, पो. मामुर्डी, ता. जावली, जि. सातारा हे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे निवडणूकीचे मतदानासाठी मतदान केंद्रावर रस्त्याने जात असताना टेंपो क्र. एम.एच.११/ए.एल.–५००१ चा चालक व मालक सामनेवाला क्र.१ संतोष रामचंद्र दानवले याने टेंपो पाठिमागे घेत असताना तो निष्काळजीपणे, भरधाव चालवून गेणू श्रीपती जुनघरे यांना धडक दिल्याने अपघात झाला आणि त्या अपघातामध्ये गेणू श्रीपती जुनघरे गंभीररित्या जखमी होवून उपचारा दरम्यान रुग्णालयात मयत झाले. अपघाताचे वेळी सदरचा टेंपो क्र. एम.एच.११/ए.एल.–५००१ सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीचा होता आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ श्रीराम जनरल इंशुरंस कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने दोन्ही सामनेवाले नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

०३. सामनेवाला क्र. १ यांनी आपले म्हणणे दिलेले नाही. सामनेवाला क्र.२ यांनी निशाणी ६ वर म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे.

०४. अर्जदारांनी यादी नि. ४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे मेढा पोलीस ठाणे यांचेकडील दि.०५/०३/२०१७ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.३२/२०१७ मधील खबरी जबाबावरुन अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहन त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

०५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, टेंपो क्र. एम.एच.११/ए.एल.–५००१ चा सामनेवाला क्र.२ यांचेकडे सामनेवाला क्र.१ यांनी मालक या नात्याने दि.०४/०५/२०१६ ते ०३/०५/२०१७ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.२ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

०६. अर्जदार यांनी हजर केलेल्या मरणोत्तर पंचनामा व शव विच्छेदन अहवाल यावरुन असे स्पष्ट होते की, गेणू श्रीपती जुनघरे याचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाले क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदार यांना रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः ०१/०१/२०१९

( राजेंद्र द. सावंत )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.